# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.05.2025** **वार- मंगळवार**

---

**मॉकड्रील**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर युद्धसदृश स्थिती उद्भवण्याची शक्यता गृहीत धरून सुसज्ज राहण्याच्या उद्देशानं केंद्रीय गृह मंत्रालयानं सर्व राज्यांना उद्या म्हणजे सात मे रोजी, मॉक ड्रिल म्हणजेच युद्ध सज्जता सराव करण्याचे आदेश दिले आहेत. देशभरातल्या २४४ नागरी संरक्षण प्रभागांमधे हा सराव होणार असून महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या जिल्ह्यांमधे निवडक ठिकाणी हा सराव होईल. हवाई हल्ल्याच्या वेळी वाजवला जाणारा सायरन या सरावादरम्यान वाजवला जाईल. हल्ला झाल्यास करण्याच्या हालचालींविषयी नागरिकांना, विशेषतः विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणं, तसंच धोक्याचा इशारा देणारी यंत्रणा, नियंत्रण कक्ष, इत्यादींची सज्जता तपासून पाहणे हा या सरावाचा भाग आहे.

**टपाल तिकीट**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जन्मस्थळी, म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी इथं आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. यात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. चौंडी इथं पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाच्या जतन आणि संवर्धनासाठी सुमारे 681 कोटी रुपयांच्या निधीला यावेळी मंजुरी देण्यात आली. अहिल्यानगरमध्ये मुली आणि महिलांसाठी नवीन आयटीआय सुरु करणं, अष्टविनायक गणपती मंदिरांच्या जिर्णोद्धारासाठी, श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकास आराखड्यासाठी आणि श्री क्षेत्र ज्योतीबा मंदिर विकास आराखड्यासाठी निधीला मंजुरी देण्यात आली. नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये होणाऱ्या आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कुंभमेळा प्राधीकरण अध्यादेश-2025 जारी करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीदरम्यान टपाल खात्याच्या पुणे विभागाचे संचालक अभिजीत बनसोडे यांच्या हस्ते विशेष टपाल पाकीटाचं लोकार्पण करण्यात आलं. ही पाकीटं असलेला पहिला अल्बम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ

शिंदे, उपमुख्यमंत्री, अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, मंत्रिमंडळातील सर्व मंत्री तसंच लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

**बस**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे विभागाला नव्याने दहा बस मिळाल्या आहेत. आतापर्यंत पुणे विभागाला 50 नव्या बस मिळाल्या; त्या स्वारगेट, शिवाजीनगर, इंदापूर, दौंड या चार विभागाला देण्यात आल्या होत्या, आता नव्याने आलेल्या दहा बस नारायणगाव आगाराला देण्यात आल्या आहेत.

**अतिक्रमण**

पुणे शहरातील विविध भागांतील अतिक्रमणांवर कारवाई करून त्याचा सविस्तर अहवाल अतिक्रमण विभागाने दररोज सादर करावा,' असे आदेश पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिले आहेत. शहरातील रस्त्यांवर अतिक्रमणांबाबत महापालिका आयुक्तांकडे तक्रारी आल्या होत्या. त्यावर आयुक्तांनी हे आदेश दिले आहेत.

**मिळकत कर**

पुणे महापालिकेच्या वतीने नागरिकांना देण्यात आलेल्या मिळकतकराच्या देयकांवर ४० टक्के सवलत मिळाली आहे की नाही, याचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये गोंधळाचं वातावरण निर्माण झालं आहे. बिलांवर सवलतीचा उल्लेख करावा, अशी मागणी वारंवार महापालिकेकडे करूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी केला आहे.

**बंधुता**

विश्वबंधुता साहित्य परिषद, रयत शिक्षण संस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय आणि काषाय प्रकाशन या संस्थांच्या वतीने पुढील महिन्यात होणाऱ्या सातव्या विश्वबंधुता काव्य महोत्सवाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ गजलकार सिराज शिकलगार यांची, तर स्वागताध्यक्षपदी विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समितीच्या अध्यक्षा भारती जाधव यांची निवड करण्यात आली आहे, विश्वबंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी आज पत्रकारांना ही माहिती दिली

**बुद्धिबळ**

महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटनेच्या वतीने पुण्यात खुल्या गटाच्या मुलं आणि मुलींच्या बुद्धिबळ स्पर्धा सुरू आहेत. यामध्ये पुण्याचा कवीश भट्टड, निशवंत रामकुमार आणि नागपूरचा निहांश खोडे हे पाच

गुणांसह आघाडीवर आहेत तर मुलींच्या गटात पुण्याची रितिका नंदी चार गुणांसह आघाडीवर आहे. राज्यभरातील साडेतीनशे बुद्धिबळपटू यात सहभागी झाले आहेत.

**खेलो इंडिया**

बिहारमध्ये सुरू असलेल्या खेलो इंडिया क्रीड़ा स्पर्धेत आज सकाळचं सत्र महाराष्ट्राच्या सिद्धेश घोरपडे याने. गाजवलं. त्याने ट्रॅक सायकलिंग क्रीडा प्रकारात सुवर्ण कामगिरी केली. मूळचा कोल्हापूरचा असलेला सिद्धेश गेल्या अनेक वर्षांपासून पुण्यात सराव करत आहे. दुसरीकडे मुलांच्या मल्लखांब सांघिक गटात महाराष्ट्रानं सलग सातव्या वर्षी रौप्य पदक पटकावलं आहे. पुण्याच्या आयुष काळंगे, निशांत लोखंडे, ओम गाढवे, आर्यन आबोडकर यांच्या संघाने सांघिक मल्लखांबच्या तिन्ही प्रकारात चमकदार खेळाचं प्रदर्शन घडवलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 37 अंश सेल्सिअस तर किमान तापमान 23 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या कमाल तापमानात आणखी थोडी घट होण्याची शक्यता असून आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे**.**

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**